


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

तारुण्याचा जोम अंगी आहे
तोवरच कोणतीही गोष्ट शक्य होईल
कार्याला लागण्याची अत्यंत
उचित अशी हीच वेळ आहे...
– अल्बर्ट आइंस्टाइन

वर्ष : ०५ | अंक : ६४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१८ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## भाजपचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव कर्डीले यांचं निधन वयाच्या ६६ व्या वर्षी अखेरचा श्वास



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, अहिल्यानगर :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवाजी भानुदास कर्डीले यांचं निधन झाल्याचं दुर्दैवी वृत्त समोर आलं आहे. वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ह्रदयविकाराच्या तीव्र धक्क्याने डहळींरक्षळ घरॲवळश्रश यांची प्राणज्योत मालवली. ते अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार होते. त्यांनी सहावेळा आमदारकी भूषवली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांचे ते सासरे होत.

मोठ्या आजारातून ते नुकतेच बरे झाले होते. पहाटे त्यांना त्रास होऊ लागल्याने नगर शहरतील एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आले, तेव्हा डॉक्टरांनी निधन झाल्याचे सांगितले. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने कुटुंबीयांसह समर्थकांवर शोककळा पसरली आहे. नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर या गावातील शिवाजी कर्डिले यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. दूध उत्पादक शेतकरी, गावात सरपंच, आमदार, राज्यमंत्री असा त्यांचा मोठा राजकीय प्रवास राहिला आहे.

**●कोण होते शिवाजीराव कर्डीले ?**

शिवाजीराव कर्डीले २००९ मध्ये भारतीय जनता पक्षाकडून उभे होते. त्यांनी ५७ हजार ३८० मतं मिळवून विजय संपादन केला होता. २०१४ मध्येही ९१ हजार ४५४ मतांनी विजय मिळवला होता. सुरुवातीला त्यांनी आपला दुधाचा व्यवसाय सुरू केला. काही काळ ते गावचे सरपंच राहिले होते. त्यानंतर अपक्ष म्हणून आमदारकीसाठी उभे राहिले आणि निवडूनही आले. जमिनीचे व्यवहार, बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा आणि हॉटेल उद्योग यामुळे त्यांचे नाव संपूर्ण जिल्ह्याभरात झाले. २०१४ च्या निवडणुकीत कर्डिले यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुरीमध्ये जाहीर सभा घेतली होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागते.

## काही 'सुतळी बॉम्ब' घेऊन आलेत..

### छगन भुजबळ यांना ओबीसी मेळाव्यात मोठी शंका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, बीड :** ओबीसी नेत्यांच्या महाएल्गार मेळाव्याचं बीडमध्ये आयोजन करण्यात आलं आहे. या एल्गार मेळाव्याला मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके उपस्थित आहेत. या मेळाव्याच्या सुरुवातीला मंत्री छगन भुजबळ यांनी मोठी भीती व्यक्त केली. काही लोकं आपल्यामध्ये कदाचित घुसवली असल्याची शक्यता आहे. मी असंही ऐकलं की, काही सुतळी बॉम्ब घेऊन आले आहेत. ते काहीतरी गडबड करतील, अशी भीती छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. त्यांना तिथेच दाबायचं आणि गपचूप पोलिसांच्या हवाली करायचं. तुम्ही कुणीही इकडे तिकडे बघायचं नाही. शांततेने आपले नेते लोक काय सांगतात ते ऐकायचं. नेते लोकांनी देखील कमीत कमी शब्दांत आपले विचार पोहोचवावेत एवढी विनंती करतो, असंदेखील आवाहन छगन



भुजबळ यांनी यावेळी केलं.

आता इथे उपस्थित असलेल्यांची नावे घेतली तरी अर्धा तास जाईल. या सगळ्यांना भाषण करायला लावलं तर माझं भाषण रात्री १२ वाजता सुरु होईल. त्यामुळे प्रत्येक समाजाच्या निवडक व्यक्तींनी शांतपणे बोला. आमचे अनेक लोक आमच्यावर नाराज होतात. आम्हाला बोलावलं नाही, काही लोक म्हणतात आमचा फोटो छापला नाही. मला बोलावलंच नाही. मला त्या सर्वांना सांगायचं आहे की, अधिकारसाठीच्या लढाईत निमंत्रण पाठवलं जात नाही, असं छगन भुजबळ म्हणाले.

**लक्ष्मण हाके भाषणात काय म्हणाले?**

भुजबळ साहेब तुम्हाला बीडमध्ये येऊ दिले जाणार नाही असे बीडमध्ये काही जण म्हणत होते. अरे बीड जिल्ह्याची भूमी आहे. मी एक जीआर घेऊन आलो आहे ज्यात ओबीसीचे आरक्षण संपवणार आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, पहिल्यांदा राज्य मागासवर्ग आयोग बरखास्त करा. मराठा समाज आणि कुणबी समाज एकच आहे असे म्हणणे म्हणजे सामाजिक मूर्खपणा आहे. हा काढलेला जीआर मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा जीआर आहे. ओबीसींच्या जेवणात माती कालवण्याचे काम या जीआरच्या माध्यमातून केले आहे, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली.

हा जरांगे चौथी पास. त्याने राज्याच्या पहिल्या नागरिकाला त्यांच्या आई-बहिणीवर शिव्या दिल्या, अशा शब्दांत लक्ष्मण हाके यांनी टीका केली. प्रत्येक वेळी आम्हाला न्यायालयात जाऊन जर दाद मागावी लागत असेल तर तुम्हाला आम्ही मतदान का केले? प्रकाश सोळंके, बजरंग बाप्पा तुम्हाला आम्ही मतदान दिले आहे. तुम्ही आपली भूमिका कधी स्पष्ट करणार, तुम्ही या आता मतदान करण्यासाठी... तुम्हाला ओबीसीचे आरक्षण पाहिले असेल तर तुम्हाला जन्माने ओबीसीमध्ये यावे लागेल. आरक्षण म्हणजे गरिबी हटावचा कार्यक्रम नाही, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

## घरातून निघाले ते परतलेच नाही दोन दिवसांनी दिव्यांग शिक्षकाची बॉडी सापडली



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, बुलढाणा :** एका दिव्यांग शिक्षकाने विहिरीत उडी घेत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटन बुलढाणा येथे घडली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मेरा बुद्रुक येथील रहिवासी असलेले शिक्षक रामदास भास्करराव पडघन (वय वर्ष ४०) यांनी चिखली येथील सहारा पार्क येथील एका विहिरीमध्ये उडी घेत आपले जीवन संपवल्याची घटना समोर आल्याने एकच खळबळ माजली आहे.

गुरुवार १६ ऑक्टोबर रोजी दुपारी ही घटना उघडकीस आल्याची माहिती आहे. बुलढाण्यातील चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील रहिवासी रामदास भास्करराव पडघान हे एका हाताने दिव्यांग होते. ते अंधेरा येथील जिल्हा परिषद शाळेवर सहाय्यक शिक्षक म्हणून गेल्या बारा वर्षांपासून कार्यरत होते. त्यांची पत्नी या सुद्धा एका खाजगी शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या दाम्पत्याला दोन अपत्ये आहेत. एक पंधरा वर्षांची मुलगी आणि दहा वर्षांचा मुलगा आहे. हे कुटुंब चिखली येथील सहारा पार्कमध्ये फ्लॅट घेऊन राहतात. रामदास भास्करराव पडघान हे १४ ऑक्टोबर रोजी सकाळी घरात पत्नी आणि मुलाबाळांना काहीही न सांगता निघून गेले. सकाळी गेलेले ते संध्याकाळपर्यंत घरी परतलेच नाही. त्यामुळे त्यांचा शोध घेण्यात आला. पत्नी आणि दोन्ही मुलांनी खूप शोधा शोध केली पण ते कुठेही सापडले नाहीत. त्यामुळे शंका, वाईट विचार डोक्यात याला सुरुवात झाली.

त्यांच्या पत्नीने मेरा बुद्रुक तसेच आजूबाजूला शोध घेण्यास सांगितले, त्यांच्या सांगण्यावरुन सर्व नातेवाईक मित्रपरिवार त्यांचा शोध घेऊ लागले. तेवढ्यात फ्लॅट मालक नितीन पाटील हे सकाळी व्यायाम करण्यासाठी फिरत असताना त्यांना ते राहत असलेल्या घराजवळील एका विहिरीमध्ये एक मृतेह दिसून आला. हे पाहताच त्यांनी पडघान यांच्या नातेवाईकांना आणि पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच सर्व नातेवाईक आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांच्या मृतदेह पाहताच पत्नीने एकच टाहो फोडला.

## इच्छुक उमेदवारांची मोर्चेबांधणी सुरू !

### गण व गटनिहाय आरक्षण जाहीर, आता प्रतीक्षा निवडणूक आयोगाच्या तारखेची

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका जाहीर होण्याची चाहूल लागली असून मंद्रूप गटाबरोबर संपूर्ण दक्षिण तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अलीकडेच जाहीर झालेल्या गण व गट निहाय आरक्षणाच्या यादीनंतर इच्छुक उमेदवारांची धडपड अधिकच वाढली आहे. आता सर्वांचे लक्ष निवडणूक आयोगाकडे लागले असून, निवडणुकीच्या तारखेची अधिकृत घोषणा कधी होणार याची उत्सुकता ग्रामीण भागात शिगेला पोहोचली आहे.

आरक्षण जाहीर होताच काही उमेदवारांचे चेहरे खुलले, तर काहींच्या चेहऱ्यावर निराशा उमटली. तरीही राजकारणात 'अशक्य काहीच नाही' या विश्वासावर नवे समीकरण मांडण्याचे प्रयत्न जोरात सुरू झाले आहेत. गावागावातील पारावर राजकीय चर्चेचे सत्र रंगले असून, काही ठिकाणी जुन्या गटबाज्यांमध्ये नव्या गटांचे बीज रोवले जात आहे. दरम्यान, सोशल मीडियावर पोस्टरबाजीचा अक्षरशः पूर आला आहे. 'जनतेचा



सेवक', भावी जिल्हा परिषद सदस्य,'आपला माणूस', एकच वादा आपला दादा 'विकासासाठी कटिबद्ध' अशा अनेक घोषवाक्यांनी उमेदवारांनी आपली प्रतिमा उभी करण्याची शर्यत सुरू केली आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टॉग्रामवर शुभेच्छा, वाढदिवस, कार्यपूर्ती, जनसंपर्क दौरे यांच्या पोस्ट्स झळकत आहेत. काही ठिकाणी या पोस्टरबाजीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे वारे वाहू लागले आहेत.

ग्रामीण भागातील पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांची नेत्यांकडे मोर्चेबांधणी सुरू असून, उमेदवारी निश्चित करण्यासाठी इच्छुक मंडळी जिल्हा व तालुका पातळीवरील प्रभावी नेत्यांच्या संपर्कात आहेत. प्रत्येक गावात चहापान बैठका, रणनीती आखणी, गट-उपगटांचे खलबते सुरू आहेत. पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका यावेळी अत्यंत चुरशीच्या होणार असून, आरक्षण जाहीर

* गण व गट निहाय आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय समीकरणांमध्ये उलथापालथ
* पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीचा माहोल तापला !
* निवडणुकीच्या तारखेच्या घोषणेची सर्वांनाच उत्सुकता
* सोशल मीडियावर इच्छुक उमेदवारांची पोस्टरबाजी व प्रचार मोहीम वेगात
* नेत्यांकडे मोर्चेबांधणी, गटबाजी आणि रणनीती सुरू

झाल्यानंतरचा राजकीय ज्वर आता उफाळून आला आहे. आगामी काही दिवसांत राजकीय वातावरण अजून तापेल, इतकं नक्की !

## मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमात ठाकरे कुटुंबाने एकी दाखवली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आज मोठा दिवस मानला जात होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची गेल्या काही दिवसांपासूनची आज सातवी भेट घडून आली. मनसेकडून दादरच्या शिवाजी पार्क मैदानात आयोजिक करण्यात आलेल्या दीपोत्सव कार्यक्रमाचं उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पार पडलं. उद्धव ठाकरे आज कुटुंबासह संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ बंगल्यावर दाखल झाले होते. उद्धव ठाकरे यांच्यासोबत पत्नी रश्मी ठाकरे, मुलगा तेजस ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे हे देखील शिवतीर्थ बंगल्यावर दाखल झाले. ठाकरे कुटुंबियांच्या यावेळी भेटीगाठी झाल्या. यानंतर तासाभराने ठाकरे बंधू कुटुंबासह शिवाजी पार्कच्या दिशेला रवाना झाले. मनसेच्या या दीपोत्सवात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे काय बोलणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. पण या दीपोत्सवात फार वेगळंच घडलं. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या वेळेला मनसेकडून उद्धव ठाकरे यांच्या कुटुंबियांचं आणि त्यांच्या पक्षाच्या प्रमुख नेत्यांचं पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आलं. यानंतर उद्धव ठाकरे केवळ दोन-तीन वाक्य बोलून मंचावरुन माघारी परतले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. दिवाळी असल्या कारणास्तव ठाकरे बंधूंनी या कार्यक्रमात राजकीय भाष्य करणं टाळलेलं बघायला मिळालं. तर राज ठाकरे यांनी आपलं मनोगत यावेळी व्यक्त केलं नाही.

## दिवाळीत नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या बंद; कांदा विक्रीसाठी रांगा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, नाशिक :** दिवाळीच्या कालावधीत आठवडाभर जिल्ह्यातील बाजार समित्या बंद राहणार आहेत. परिणामी, शेतकऱ्यांनी बाजारात मोठ्या प्रमाणावर कांदा आणण्यास सुरुवात केल्याने दर कोसळले आहेत. किमान ४०० ते कमाल १५०० रुपयांपर्यंत कांद्याचे भाव उतरले आहेत. त्यामुळे ऐन दिवाळसणाच्या तोंडावर कांदा उत्पादकांसोबत व्यापारीवर्गातही नाराजीचे वातावरण आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा आणल्याने पुरवठ्यात भर पडली आहे. यामुळे ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध होत आहे. सध्या कांद्याला सरासरी ७०० ते ८०० रुपयांपर्यंत प्रतिक्विंटल भाव मिळतो आहे.

लासलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज नवीन कांदा बाजार आवार आणि पिंपळगाव बसवंत उपबाजार आवार या मुख्य कांद्याच्या बाजार समित्यांमध्ये दि. १७ ते २३ या काळात कांद्याचे लिलाव दीपावलीनिमित्त बंद राहणार आहेत. बाजार समित्यांनी याबाबतची सूचना दिली असून, या बंदमुळे शेतकऱ्यांनी आधीच मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी बाजारात आणला आहे. यामुळे बाजारात पुरवठ्याचे प्रमाण वाढले असून, मागणी आणि पुरवठ्यातील अंतर कमी होत आहे. गुजरात, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशसारख्या इतर राज्यांमध्येही कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू आहे. देशांतर्गत बाजारातही 'एनसीसीएफ' आणि नाफेड बफर स्टॉक मधील कांदा कमी दरात ग्राहकांना उपलब्ध करून दिल्याने शेतकरी व व्यापाऱ्यांकडील कांदा मालास उठाव नाही. यातच नुकताच अतिवृष्टीने दणका दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

**बफर स्टॉकची विक्री बंद करा !**

भारतालगतच्या श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ यांसारख्या देशांमधील राजकीय धोरणे व अस्थिर परिस्थितीमुळे तेथे कांदा निर्यात शक्य होत नाही. तर, आंतरराष्ट्रीय बाजारात चीनसारखे देशही भारताशी कांदा विक्रीत स्पर्धा करीत आहेत. या स्थितीत शासनाने कुठल्याही स्थितीत नाफेड व 'एनसीसीएफ'कडील बफर स्टॉकमधील कांदा विक्री बंद करावी, धोरणांमध्ये सुधारणा करावी आणि कांदा उत्पादकांना किमान १५०० रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी राज्य कांदा उत्पादक संघटनेने शासनाकडे केली आहे.




## ओबीसी मोर्चा...

नागपुरातील ओबीसी मोर्चा दणक्यात आटोपला. 'पिवळ्या वादळा'ने अनेकांना धक्का दिला. त्यातून काँग्रेसच्या मजबुतीची चर्चा अपेक्षित होती. झाले मात्र भलतेच. काँग्रेसला तसाही दुहीचा शाप आहे. 'गुण्यागोविंदा'ने राहण्याचा भास तिथे जपला जातो. या 'आभासी ऐक्या'ला नागपूरच्या मोर्चाने तडाखा दिला.

राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी भिडले आहेत. काँग्रेसमधील काहींचा पाय जरांगेंत आहे. काही भाजपच्या रांगेत आहेत. विरोधी पक्ष फोफावला तरी स्वजनांचा लखलखाट वाढू नये, ही जळजळ दिवाळीपूर्वीच्या या आंदोलनात दिसली. काळजी आणि काजळीत हेच अंतर असते. पिवळे दुपट्टे आणि झेंड्यांच्या भरगच्च गर्दीत काँग्रेसमधील कलहाचा बोभाटा झालाच.

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी हा मोर्चा एकहाती यशस्वी केला. अनेकांनी त्यांना बाहेरून पाठिंबा देण्यात धन्यता मानली. हर्षवर्धन सपकाळ प्रदेश काँग्रेसचे तारू जिद्दीने हाकत आहेत. सर्वोदयी नेते असतानाही पक्षात डावेपण रुजवित असल्याचा आरोप त्यांच्यावर होतो. सपकाळ परिश्रमांमध्ये हार जाणारे नाहीत. लोकप्रिय नेत्यांचे पाय खेचण्याचे कसब काँग्रेसमध्ये वेगळ्याने शिकवावे लागत नाही. ओबीसींना एकवटण्यात वडेट्टीवारांना सर्व नेत्यांची साथ लाभली नाही. काही नेते मोर्चात येऊन हात लावून आउट करून गेले.

ओबीसींच्या आहारी गेल्यास मराठे दुखावतील या कयासातून काही नेते वामकुक्षी घेत होते. विजय वडेट्टीवार तेव्हा भर उन्हात मोर्चेकऱ्यांच्या शिदोरीतील पराठे खात होते. भाजपला टक्कर देणे आधीसारखे सोपे राहिलेले नाही. अवघे राज्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्यग्र असताना भाजप बिहारसोबतच आसाम, केरळ, तामिळनाडू, पुदुच्चेरी, पश्चिम बंगालच्या तयारीला लागली आहे. सरन्यायाधीशांवरील बूट हल्ल्याचा निषेध न केल्यास बिहारवर परिणाम होईल हे भाजपला उशिरा का होईना, पण कळले. सोनिया गांधी यांची प्रतिक्रिया आल्यानंतर 'एक्स'वर पोस्ट करून पंतप्रधानांनी संभाव्य पडझड थोपविली. अशा समन्वयात काँग्रेसची गाडी लेट होते.

राज्यात विजय वडेट्टीवार यांनी 'आमदारकी गेली खड्ड्यात' हे निर्वाणीचे बोल ऐकवत पक्षाला इशारा दिला. ओबीसींची घुसमट बीबीसीपर्यंत नेणारा नेता म्हणून ते ओळखले जातात. पूर्वाध्यक्ष नाना पटोले मोर्चात नव्हते. नानांच्या मतदारसंघातील गणेशोत्सवाच्या प्रचारी फलकांवर 'पंजा' झळकला. दुर्गोत्सवात तो अचानक गायब झाला. नाना आणि गोपाल अग्रवाल यांना भाजपची दारे खुणावू लागली आहेत. एका वजनदार भाजप नेत्याने प्रतिष्ठेचा मुद्दा करीत एन्ट्री रोखल्याने एवढ्यात नानांच्या आगळीकीची शक्यता कमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यग्र नेते आहेत. नानांची आई गेली तेव्हा ते घरी जाऊन भेटून आले. निखळ राजकीय संस्कृती जपण्याची ही वैदर्भीय परिपक्वता स्वपक्षीय ऐक्याच्यावेळी काँग्रेस नेत्यांकडून विसरली जाते. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे जगन्मित्र आहेत. त्यांनीही मोर्चाला दांडी मारली.

वडेट्टीवार धडकून बोलतात. सरकारला 'लाडका गुंड योजना' काढण्याची उपरोधात्मक सूचना करतात. कर्जवसुली करणाऱ्या बँकवाल्यांना बदडून काढा या आक्रमक भूमिकेत जातात. फोन टेप होत असल्याचा संशय असतानाही 'माझे नेते भुजबळ नाहीत, राहुल गांधी आहेत' हे बोलायला कचरत नाहीत. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना सहा महिन्यांचे वेतन देतात. मराठा उद्योजकांना १३ हजार कोटी द्या, पण ओबीसींना गुंडाळायचे नाही, हा त्यांचा पवित्रा असतो. ओबीसीहिताचे ५८ निर्णय घेऊन शासनाने शुभसंकेत दिले असताना कार्यकर्त्यांची धुनी पेटती ठेवण्याचे काम वडेट्टीवारांना करावे लागेल. यशवंत स्टेडियम ते संविधान चौकापर्यंत 'यलो-यलो' जलवा केल्यानंतरही आंदणात मिळालेले गुप्तशत्रू वडेट्टीवारांना 'डर्टी फेलो' ठरवित आहेत. मायक्रो ओबीसी असलेल्या वडेट्टीवारांनाच आता मेजर भूमिका पार पाडावी लागेल.

# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!



आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो.

दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र - मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते ? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणामही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई - दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कँडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कँडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

## कातकरी बांधवांचा अन्नाचा अधिकार हिसकावणाऱ्या रेशन दुकानदारावर श्रमजीवी मार्फत गुन्हा दाखल; परवाना रद्द

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पालघर :** पालघर तालुक्यातील चहाडे येथील आदिवासी कातकरी लोकांना रेशनिंग धान्य देण्यास टाळाटाळ करणाऱ्या, त्यांचा अन्नाचा अधिकार हिसकावणाऱ्या रेशन दुकानदारावर श्रमजीवी संघटनेमार्फत ताबडतोब गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा परवाना रद्द करण्यात आला आहे. चहाडे कातकरी पाड्यातील राम शांताराम गरेल हे अपंग असून त्यांच्या शिधापत्रिकेवर ऑनलाईन पावती काढूनही रेशन दुकानदाराने धान्य दिले नव्हते.

इतकेच नव्हे, तर अंदाजे १५ कार्डधारकांनाही अशाच प्रकारे ऑनलाईन पावती देऊन धान्य देण्यात आले नाही. ही



गंभीर बाब श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर पालघर जिल्हाध्यक्ष सुरेश रेंजड यांच्या मार्गदर्शनाखाली पालघर तालुका अध्यक्ष उल्हास पाटील, सचिव हीना वनगा, माजी अध्यक्ष ॲड.राजेश राऊत, शंकर वरखंडे, सुदाम धिंडा, प्रमिला पवार, कैलास त्रिवेदी, महेंद्र पाटील, मनोज कवळी आदींनी तहसीलदार रमेश शेंडगे यांच्या कार्यालयात जाऊन पुरवठा अधिकारी विजय बच्चे यांना या प्रकाराचा जाब विचारण्यात आला.

तहसीलदारांनी तात्काळ श्रमजीवी संघटनेने निदर्शनास आणून दिलेल्या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले असून रेशन दुकानदाराविरुद्ध गुन्हा नोंदविण्याचे व परवाना रद्द करण्याचे निर्देश दिले. रात्री उशिरा पर्यंत सुमारे साडे बारा वाजता श्रमजीवीमार्फत गुन्हा नोंदविण्यात आला. दुकानदाराचे परवाना रद्द करण्यात आले.

श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सततचा पाठपुरावा केला. आदिवासी कातकरी बांधवांना त्यांच्या मूलभूत प्रश्नासाठी लढवले आणि एक वर्षांपासून थांबलेले रेशन मिळाले.

### धनतेरस..

पंच महाभूत हे धन
कथा पुराणी सुरस
तेरा दीप ऊजळूनि
करावे मुख दक्षिणेस

दीवा लावता शेजारी
तोचि सण धनतेरस
सर्वे संतु निरामयः
दिवाळी दुसरा दिवस

दीप उजळूया मनात
जाळूनि टाकू हवस
महिला होता सबला
दिसे तेव्हाचं साहस

नको उपाशी कुणी
न हो कुणाचा विरस
न मागता द्या प्रकाश
हाचि सन्मार्ग सरस

आनंद देण्या दुजास
लागाया हवी चुरस
दीप लावता देव्हारी
उजळून जावो परस

आरोग्यकर्मीयाजाण
अमूल्य लाभे पारस
धन्वंतरी देवांचा वैद्य
उजळे सुवर्ण दिवस

प्रसन्न होता धन्वंतरी
आरोग्य होईल सकस
तना सह मनही शुध्द
सोडवे दुर्गुणी आकस

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# दिवाळी सण मोठा, आनंदाला नाही तोटा!




दिवाळी सण मोठा, आनंदाला नाही तोटा! ` असं आपल्या लोकजीवनात म्हटलं जातं. सण-उत्सवांमधून समाजात एक नवचैतन्य संचारत असतं. एखादा सण, उत्सव किंवा घरगुती समारंभ असला की आपण महिनाभर, कधी दोन महिन्यांपूर्वीच उलटी मोजणी सुरू करतो. आपण सारे आनंद मिळवणे, सुखाचे क्षण अनुभवणे हेच जीवनाचे अंतिम ध्येय समजत असतो.

अलीकडेच माझ्या परिचयातील एक वयोवृद्ध काका भेटले. मी विचारलं, काय काका, तब्येत कशी आहे? काका थोड्याशा नाराजीच्या स्वरात म्हणाले, आता येणारी प्रत्येक दिवाळी ही ' बोनस ' आहे. त्यांच्या बोलण्यातला गूढ अर्थ मला जाणवला. साठी ओलांडल्यानंतर शरीर कुरकुरायला लागते. शारीरिक व्याधी डोकं वर काढू लागतात ` शुगर, बीपी, सांधेदुखी सुरु होते.जीवनातील अपरिहार्यता हळूहळू उमजू लागते. आपल्याला ठाऊक आहे ` दिवाळीला मिळणारे अतिरिक्त वेतन म्हणजे बोनस. पण काकांच्या अर्थाने दिवाळीचं येणं हेच आयुष्याच्या उतरत्या काळातील एक बोनस आहे, ही जाणीव मला आतून गदगदून सोडत होती.

ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात दिवाळी येते आणि त्याचसोबत हिवाळ्याची चाहूल लागते. थंडीत भूक वाढते, शरीराला जोम येतो. खरं तर हा हेल्दी सीझन असतो. व्यायाम वाढतो, झोप चांगली लागते, आणि मनात उत्साह ओसंडून वाहू लागतो. अशा वेळी शरीराला अतिरिक्त खुराकाची गरज भासते. कदाचित याच कारणासाठी दिवाळीच्या सणात मिठाई बनवण्याची परंपरा सुरू झाली असावी.

या काळात पचनक्रिया मजबूत असते, म्हणूनच लाडू, करंज्या, चकल्या, चिवडा यांसारखे स्वादिष्ट पदार्थ मनसोक्त खाल्ले जातात. प्रकाशाची उधळण होते, फटाक्यांची आतषबाजी आकाश उजळवते. देवदेवतांची पूजा करून दीर्घायुष्य, धनलाभ, मनःशांती आणि कौटुंबिक सौख्य मिळण्यासाठी प्रार्थना केली जाते.फराळाची आमंत्रणे दिली जातात, आपुलकी वाढवली जाते. स्नेह वृद्धिंगत करण्याचं काम दिवाळी करते. म्हणूनच म्हटलं जातं ` दिवाळीचा सण मोठा आनंदाला नाही तोटा !

आपल्या भारतीय परंपरेनुसार गृहस्थाश्रमाचा कालावधी वयाच्या २५ ते ५० वर्षांपर्यंत मानला आहे. या काळात कार्यकर्तृत्व गाजवत, विविध विषयांचं सुख उपभोगत माणूस जगत असतो. या काळात शरीर सबळ आणि मन खंबीर असतं. जो भी होगा, देखा जायेगा! असं म्हणत जीवन एन्जॉय करण्याचा हा काळ असतो. या टप्प्यावरची दिवाळी म्हणजे काकांच्या भाषेत सांगायचं तर बोनस नव्हे, तर नियमित वेतन असतं.

बालपणीची दिवाळी मात्र कायम स्मरणात राहणारी असते. कोणत्या वर्षी कसे फटाके उडवले, कुठे फिरायला गेलो, कोणते कपडे घातले ` हे सगळं आयुष्यभर लक्षात राहतं. त्या काळात संसाराची, जबाबदारीची भ्रांत नसते. खेळ गप्पा गाणी गोष्टी या पलीकडे जग नाही अशीच एक समजूत बालपणी असते. दिवाळीत नवीन कपडे, मिठाई, सुट्टी आणि मिळणारे फटाके ` म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे!

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर येणारी दिवाळी आनंद देऊन जाते. या दिवाळीत प्रत्येकाच्या मनात आनंदाचे लाडू फुटत राहो, सतत हास्याचे फुलबाजे उडत राहो,मनाच्या कानाकोपऱ्यात नवचैतन्याचे दीप पेटत राहो... हीच दिवाळीची सर्वांना शुभेच्छा !

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात अनिल ढेबेची आंतर विभागीय स्पर्धेत चमकदार कामगिरी



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१७, खंडाळा (सातारा) :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आयोजित सातारा विभागीय कुस्ती स्पर्धा २०२५ डी.पी भोसले कॉलेज कोरेगाव येथे संपन्न झाल्या.सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील गणेश युवराज मोरे बीएसी ०१ फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेमध्ये सहभागी होऊन सेमी फायनल पर्यंत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यासोबत अनिल जाईबाई बापूराव ढेबे बीए ०१ याने ग्रीको रोमन कुस्ती मध्ये द्वितीय क्रमांक पटकावून आंतर विभागीय(इंटर झोनल)निवड झाली. आंतर विभागीय कुस्ती स्पर्धा नुकत्याच डॉ. तानाजीराव चोरगे कला,वाणिज्य आणि विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय नंदवाळ जि.कोल्हापूर,स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे संपन्न झाल्या.अनिल बापूराव ढेबे ग्रीको रोमन कुस्ती प्रकार स्पर्धेमध्ये उपांत्य फेरीपर्यंत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. आंतर विभागीय कुस्ती ग्रीको रोमन निवड झालेला अनिल महाविद्यालयातील पहिलाच विद्यार्थी आहे. शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अनिकेत गायकवाड यांनी ग्रीको-रोमन कुस्ती प्रकाराबद्दल माहिती देताना सांगितले की, ग्रीको रोमन कुस्तीत प्रतिस्पर्ध्याला त्याच्या कमरेखालील भागाला पकडता येत नाही. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीतील कुस्तीसारखी आहे. विशेष कौतुकाची बाब म्हणजे अनिल ढेबे गेल्या २० वर्षांपासून जय हनुमान कुस्ती केंद्र, लोहोम (ता.खंडाळा) मल्ल प्रशिक्षक संतोष काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीविद्या घेत असून काशीद हे अनेक वर्षांपासून तरुण मल्लाना विनमोबदला प्रशिक्षण देत आहेत. अनिलच्या यशाबद्दल खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संस्थापक शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, सचिव अनिरुद्ध गाढवे, प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, अधीक्षक संतोष गाढवे आणि कर्मचारी वृंद, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी, कुटुंबीय अभिनंदन केले.

## पनवेल मनपातील १ हजार ३२६ कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्ताने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षाकरिता महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांना ३२ हजार रूपये, तसेच प्राथमिक शिक्षकांना, एनयुएलएम व पीएमएवाय अधिकारी यांना रूपये १०,०००/-, परिश्रमिक अधिकारी, एनयुएचएम यांना ७,०००/- व आशा वर्कर व गट प्रर्वतक यांना ७,०००/- हजार सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. या सानुग्रह अनुदानांतर्गत महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीवरील ५ अधिकारी, आस्थापनेवरील अधिकारी व कमर्चारी ८२५, प्राथमिक शिक्षक ६८, एनयुएलएम अधिकारी २, एनयुएचएम अधिकारी २, परिश्रमिक अधिकारी १७, एनयुएचएम अधिकारी २०४, कर्मचारी आणि आशा वर्कर, गटप्रवर्तक अशा मिळून २०४ असे एकूण १ हजार ३२६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, या निर्णयामुळे पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळून त्यांच्या कार्यक्षमता व सेवाभावना अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## आनंदाचा शीधा सुरू करा युवा सेनेची मागणी



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१७, उदगीर (लातूर) :** उदगीर सणासुदीच्या दिवसांमध्ये गोरगरिबांसाठी आधार असलेला आनंदाचा शिधा सुरू करण्यासंदर्भात युवासेनेच्या वतीने उदगीर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे, सचिव आमदार वरूण सरदेसाई यांच्या सुचनेनुसार लातूर जिल्हा विस्तारक ॲड.हेमंत रामगुडे व जिल्हाधिकारी लक्ष्मण पेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ शुक्रवार रोजी राज्य सरकारने बंद केलेली आनंदाचा शिधा ही योजना परत सुरु करावी या संदर्भात उदगीर तहसील कार्यालय येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार यांच्या मार्फत आनंदाचा शिधा किट साखर, चना डाळ, तेल, पाकीट सरकारला सप्रेम भेट देऊन युवासेना उदगीर च्या वतीने निषेध करून पाठवण्यात आले. यावेळी निवेदनावर उपेंद्र काळेगोरे युवासेना जिल्हा समन्वय, रोहित पाटील जिल्हा चिटणीस, मारुती केंद्रे उपजिल्हाप्रमुख, सुरज उदगीरकर शहरप्रमुख, श्याम भोसले शाखाप्रमुख, वैजनाथ माने, धीरज वाघमारे संदीप मोरतळे, वीरभद्र मलकापूर गणेश आंबेगावे आदींच्या सह्या आहेत.

## आदिवासी विद्यार्थ्यां सोबत 'दिवाळी' साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, डोंबिवली (ठाणे) :** नामदेव शिंपी समाज डोंबिवली च्या महिला मंडळाच्या वतीने अध्यक्षा स्वाती हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली जान्हवी माळवदे, सीमा पुकाळे, दिपाली अवसरे, विद्या ऐतवडे यांनी वांगणीच्या आदिवासी पाड्यावर जाऊन आगळीवेगळी दिवाळी साजरी केली. काही दिवसापूर्वी स्वाती ताई च्या मातृतुल्य वहिनी सुमनताई दिलीप कल्याणकर यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या स्मरणार्थ आदिवासी मुलांना खाऊ, स्त्रियांना साड्या व फराळाचे पदार्थ, साबण यांचे वाटप केले. सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद ही सुमनताई कल्याणकरांसाठी एक वेगळी श्रद्धांजली ठरली. जान्हवी माळवदे यांनी विध्यार्थना व महिलांना शिक्षणाचे महत्व समजावून देत आपल्या पायावर उभे राहून सक्षम बनण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. दीपक सारंगा, आप्पासाहेब, सुनिता खळदे, मंजुळा शेट्टी, उमा कार्ले व पांडुरंग घोडके यांनी विशेष सहकार्य केले.

# आ.जोरगेवार यांच्या मध्यस्थीने सफाई कामगारांचे कामबंद आंदोलन मागे

## कामगारांच्या मागण्या मान्य, कामगारांना मिळणार दिवाळी बोनस

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत नाली सफाई कामगारांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महानगरपालिका कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले होते. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. यात आ. किशोर जोरगेवार यांच्या मध्यस्थीने कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या असून, कामगारांनी आंदोलन मागे घेतले आहे.

वेतनवाढ, प्रलंबित वेतन तातडीने देणे, कायमस्वरूपी नियुक्तीची प्रक्रिया सुरू करणे, दिवाळी बोनस तसेच कामाच्या अटी सुधाराव्यात या प्रमुख मागण्या घेऊन कामगारांनी कष्टकरी जनसंघ संघटनेच्या नेतृत्वात आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे दोन दिवस नाले सफाईचे काम



बंद पडले होते. सदर प्रकरणात आ. किशोर जोरगेवार यांनी स्वतः हस्तक्षेप करून आंदोलनकर्त्या सफाई कामगारांच्या प्रतिनिधींशी आणि महानगरपालिका प्रशासनाशी चर्चा केली. चर्चे दरम्यान सर्व मागण्यांबाबत सकारात्मक तोडगा काढण्यात आला. आ. जोरगेवार यांनी प्रशासनाला तातडीने आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले. आजच कामगारांना दिवाळी बोनस देण्याचे मनपा प्रशासनाने मान्य केले आहे. या चर्चेनंतर कामगारांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या असून, आ. किशोर जोरगेवार यांनी आंदोलनस्थळी जाऊन सफाई कामगारांशी संवाद साधला. त्यांच्या आश्वासनानंतर कामगारांनी आनंदाने आंदोलन मागे घेतले. या प्रसंगी मनपा अधिकारी, भारतीय कष्टकरी जनसंघाचे पदाधिकारी, कामगार नेते आणि कामगार उपस्थित होते. यावेळी आ. जोरगेवार म्हणाले, सफाई कामगार हे शहराच्या स्वच्छतेचे खरे रक्षक आहेत. त्यांच्या न्याय्य मागण्यांना न्याय मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे. प्रशासनाने त्यांच्या सर्व मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, असे आदेश ही आ.जोरगेवार यांनी दिले.

# शेतकरी बांधवांनी शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा - ज्ञानेश्वर (डी.के.) जगताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** खरीप हंगामातील मका, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, बाजरी व करडई या पिकांची काढणी सुरू झाली असून मोठ्या प्रमाणावर शेतीमाल बाजारात विक्रीस येत आहे. यामुळे बाजारभाव घसरून शेतकऱ्यांना आर्थिक तोटा होऊ नये, यासाठी लासलगाव बाजार समितीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सन २०२५-२६ या हंगामासाठी शेतमाल तारण कर्ज योजना सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी.के.) जगताप यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सन



१९९०-९१ पासून राबविण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत यंदा मका, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई या प्रमुख पिकांसाठी शेतकऱ्यांना तारण कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचाच माल तारणात स्वीकारला जाणार असून, शासकीय व बाजार समितीचे प्रतवारीकार यांच्या संयुक्त शिफारशीनंतर संबंधित शेतीमाल महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात ठेवण्यात येईल. त्या दिवसाचे सरासरी बाजारभाव किंवा किमान आधारभूत दर (ज्या पैकी कमी असेल तो दर) विचारात घेऊन, बाजार समिती शेतकऱ्यांना स्व निधीतून धनादेशाद्वारे कर्जरक्कम अदा करणार आहे. शेतकऱ्यांचा ७/१२ उतारा व लागवड क्षेत्रानुसार उत्पादनाचे प्रमाण निश्चित करण्यात येईल. त्यानुसार मालाच्या एकूण किंमतीच्या ७५ टक्के रक्कम ६ महिन्यांच्या मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने तारण कर्ज म्हणून दिली जाणार आहे. पुढील ६ महिन्यांसाठी व्याजदर ८ टक्के, आणि त्यानंतरच्या ६ महिन्यांसाठी १२ टक्के असा वाढता दर राहील. १८ महिन्यांनंतर कर्जास मुदतवाढ मिळणार नाही, असे समितीने स्पष्ट केले आहे. सभापती ज्ञानेश्वर (डी.के.) जगताप, उपसभापती संदीप (ललीत) दरेकर व सचिव नरेंद्र वाढवणे यांनी शेतकरी बांधवांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी लासलगाव बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात संपर्क साधावा किंवा ९९२१४२३५३६ या क्रमांकावर फोन करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# चंद्रपूरची धम्मभूमी समतेचा जाज्वल्य दीप - आ.जोरगेवार

## चंद्रपूरमध्ये ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभ उत्साहात संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या भूमीवरून समतेचा, करुणेचा आणि प्रज्ञेचा संदेश संपूर्ण मानवजात पर्यंत पोहोचला, त्या भूमीवर आज उभा राहून अतिशय आनंद व अभिमान वाटतो. या पवित्र स्थळाचा विकास करण्याचा संकल्प आपण केला आहे. ५७ कोटी रुपयांतून येथे सर्व सोयी-सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. चंद्रपूरची धम्मभूमी म्हणजे समतेचा जाज्वल्य दीप असल्याचे प्रतिपादन आ.किशोर जोरगेवार यांनी केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटी, दीक्षाभूमी, चंद्रपूर यांच्या वतीने ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभ दीक्षाभूमी येथे उत्साह आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात आ. किशोर जोरगेवार बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भूमीवरून दिलेला धम्माचा संदेश हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण मानवजातीसाठी आहे. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समता, बंधुता आणि न्याय या त्रिसूत्रीवर आधारित समाजव्यवस्था उभी केली. त्या विचारांमुळे आज देशात लोकशाही बळकट झाली आहे.

आजचा हा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन म्हणजे बाबासाहेबांचा मार्ग आत्मसन्मानाचा, तर्काचा आणि परिवर्तनाचा आहे हे स्मरण ठेवण्याचा दिवस आहे. त्यांनी दाखवून दिलं की, शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तीन मंत्रांमुळे कोणताही समाज अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करू शकतो. चंद्रपूर हे बाबासाहेबांच्या कार्याशी नाळ जोडलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. नागपूरनंतर चंद्रपूर येथे धम्मचक्र अनुप्रवर्तनाचा कार्यक्रम झाला. ही आपल्या जिल्ह्याची अभिमानाची बाब असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले.

**धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्य पुरी-भाजीची व्यवस्था**

भाजपा, चंद्रपूर महानगर तर्फे अनुयायांसाठी सेवा उपक्रम धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगराच्या वतीने दीक्षाभूमी, चंद्रपूर येथे आलेल्या बौद्ध अनुयायांसाठी पुरी-भाजीची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदनेने करण्यात आली. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांची ही उपस्थिती होती.

# पुणे शहराला सायकल राजधानी बनवायचं की वाहतूक मुक्त शहर बनवायचं?

**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.१७, पुणे :** पुणे शहर आज वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते, अर्धवट डीपी रोड, आणि अतिक्रमणामुळे त्रस्त आहे. नागरिकांना रोज तासन्तास ट्रॅफिकमध्ये उभं राहावं लागतं. अशा वेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी पुणे भारताची सायकल राजधानी बनणार अशी घोषणा करणे म्हणजे वास्तवापासून पूर्णपणे दूर जाणं आहे.

महापालिकेने आधी शहरातील रस्ते सुटसुटीत, अतिक्रमणमुक्त, नागरिक चालण्यासाठी फुटपाथ चालण्यायोग्य बनवावेत. अनेक डीपी रोड आजही पूर्ण झालेले नाहीत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर बांधकामांचे अतिक्रमण मोठ्या प्रमाणात आहे. हे दूर न करता नव्या घोषणा करणे



म्हणजे पुणेकरांच्या बुद्धीशी खेळ करणं आहे. आधी देखील सायकल ट्रॅकसाठी कोट्यवधी रुपये खर्च करून प्रयोग करण्यात आले, पण त्याचा परिणाम वाहतूक कोंडीत झाला. हा पैसा म्हणजे पुणेकरांच्या घामाचा पैसा जो शासनाने आणि महापालिकेने या आधी वाया घालवला आहे.

आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष


आम आदमी पार्टी- पुणे शहर
प्रशांत कांबळे शहराध्यक्ष- अनुसूचित जाती
जय भिम जय शिवराय
दिनांक : १५/१०/२०२५
प्रति,
मा. आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
पुणे.
धन्यवाद.
आपला विश्वासु
प्रशांत कांबळे
आम आदमी पार्टी, पुणे
शहराध्यक्ष
महासचिव

सामाजिक न्याय विभाग प्रशांत कांबळे यांनी या घोषणेला तीव्र विरोध दर्शविला आहे. आमचा सायकल ट्रॅकला विरोध नाही, पण त्याआधी पुणे महानगरपालिका आणि ट्रॅफिक पोलीस यांनी संयुक्तपणे रस्त्यांवरील गर्दी कमी करण्याचा आणि पीएमपीएमएलचा दर्जा सुधारण्याचा ठोस प्रयत्न करावा. नागरिकांना शिस्तबद्ध वाहतूक, स्वच्छ रस्ते आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक हवी आहे केवळ घोषणाबाजी नव्हे.

आज पुणेकरांचा प्रश्न अगदी स्पष्ट आहे.

रस्ते तयार नाहीत, ट्रॅफिक नियंत्रण नाही, मग सायकल राजधानी कशी बनवणार?

पुणेकरांचा पैसा पुन्हा वाया घालवायचा का? पुणे महानगरपालिका आणि प्रशासनाने आधी नागरिकांच्या दैनंदिन समस्यांकडे लक्ष द्यावे. वाहतूक व्यवस्थापन, डीपी रोड पूर्ण करणे आणि अतिक्रमण हटविणे या गोष्टींवर काम केल्याशिवाय सायकल ट्रॅकची नवी घोषणा म्हणजे केवळ दिखाऊपणा आणि जनतेची दिशाभूल आहे.

